महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/११९१८
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दि.२६.०४.२०२३

# परिपत्रक

**विषय: कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी विषयी सर्व सूचनांचे / तरतुदींचे पालन करणेबाबत.**

**संदर्भ:** प्रशासकीय परिपत्रक क्र.५८६ दि.०५.०७.२०१९.

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम -२०१३ व दि.०९.१२.२०१३ रोजी प्रसारीत करण्यात आलेल्या तरतुदींनुसार शासन निर्णय दि.१९.०६.२०१४ च्या धर्तीवर कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.५८६ दि.०५.०७.२०१९ अन्वये शासन निर्णयामधील सुचनांचे पालन करण्याचे निर्देश यापुर्वीच प्रसारीत करण्यात आलेले आहे.

२. परंतु, परिपत्रकासोबत जोडलेल्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ०६ अन्वये सूचीत केल्याप्रमाणे "लैंगिक छळाच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही बाबतचा वार्षिक अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावा." याबाबत कार्यवाही झाल्याचे निदर्शनास येत नाही.

३. सबब, संदर्भीय प्रशासकीय परिपत्रकामध्ये पारित केलेल्या तरतुदी विचारात घेऊन व त्यासोबत जोडलेला शासन निर्णय दि.१९.०६.२०१४ मध्ये नमूद परिच्छेद क्र. १ ते ७ नुसार दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी कंपनीच्या सर्व कार्यालयीन स्तरावर काटेकोरपणे करण्यात यावी असे पुन:श्च सूचीत करण्यात येत आहे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:-** शासन निर्णय दि.१९.०६.२०१४.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / (मुख्य तपास अधिकारी) / (मुख्य विधी अधिकारी), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.